THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 19TH NOVEMBER 1896.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### सरकारी व इतर प्राव्हिडेंट फंडांसंबंधी कायदा सुधारण्यासाठीं आक्टाचा मसुदा.

ज्या अर्थी सरकारी व इतर प्राव्हिडेंट फंडांसंबंधी कायदा सुधारणें जरूर आहे; त्या अर्थीं यावरून खालीं सांगितल्याप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहे:

सरनामा, व्याप्ति व सुरुवात.

१. (१) या आक्टास सन १८९६ चा प्राव्हिडेंट फंडांबाबद आक्ट असें ह्मणावें.

(२) तो सगळ्या ब्रिटिश हिंदुस्थानास लागू आहे; आणि

(३) तो एकदम अमलांत येईल.

व्याख्या.

२. या आक्टांत—

(१) "प्राव्हिडेंट फंड" याचा अर्थ, ज्यांत कोणत्याहि वर्गाच्या किंवा वर्गांच्या नोकरलोकांच्या वर्गण्या किंवा ठेवी घेतल्या असून त्यांच्या त्यांच्या वेगवेगळ्या खातीं ठेवल्या असतील तो फंड, असा आहे, आणि त्यांत, फंडाच्या नियमांअन्वयें अशा वर्गण्यांच्या किंवा ठेवींच्या संबंधानें जमा करण्यांत आलेल्या कोणत्याहि रकमांचा, किंवा त्या वर्गण्या किंवा ठेवी यांवर चढणाऱ्या कोणत्याहि व्याजाचा समावेश होतो:

(२) "सरकारी प्राव्हिडेंट फंड" ह्मणजे हिंदुस्थान सरकारच्या कोणत्याहि वर्गाच्या किंवा वर्गांच्या नोकरलोकांच्या हितासाठीं त्या सरकारच्या अख्त्यारावरून स्थापन केलेला प्राव्हिडेंट फंड:

(३) "रेलवे प्राव्हिडेंट फंड" ह्मणजे हिंदुस्थान सरकारच्या अख्त्यारावरून, किंवा पार्लमेंटाच्या एकाद्या विशेष आक्टाअन्वयें किंवा हिंदुस्थान सरकाराशीं करार करून त्याअन्वयें जी कोणतीहि कंपनी ब्रिटिश हिंदुस्थानांतील एकाद्या रेलवेचा कारभार करीत असेल त्या कंपनीच्या अख्त्यारावरून, त्या रेलवेवरील, किंवा त्या रेलवे-संबंधी, कोणत्याहि वर्गाच्या किंवा वर्गांच्या नोकरलोकांच्या हितासाठीं स्थापन केलेला प्राव्हिडेंट फंड: आणि

(४) "अवश्य ठेव" याचा अर्थ, वर्गणीदारानें किंवा ठेव देणारानें मागितली असतां, अगर त्याच्या इच्छेप्रमाणें, जी परत देतां येत नाहीं अशी वर्गणी किंवा ठेव असा आहे, आणि त्यांत, फंडाच्या नियमांअन्वयें अशा वर्गणीच्या किंवा ठेवीच्या संबंधानें

जी कोणतीहि रकम जमा करण्यांत आली असेल तिचा व त्या वर्गणीवर किंवा ठेवीवर जें कोणतेंहि व्याज चढलें असेल त्याचा समावेश होतो.

**वर्गणीदार किंवा ठेव देणार मरण पावल्यावर सरकारी किंवा रेलवेचा प्राव्हिडेंट फंड यांतून पैका देण्याबाबद.**

३. (१) कोणत्याहि सरकारी किंवा रेलवे प्राव्हिडेंट फंडाचा एकादा वर्गणीदार किंवा त्या फंडांत ठेव देणारा मरण पावला असून त्या फंडाच्या बुकांत त्याच्या खातीं जमा असलेली रकम दोन हजार रुपयांहून अधिक नसेल, तेव्हां ती रकम मिळण्याचा हक्क असणाऱ्या मनुष्यास ती देण्याचें काम ज्या अमलदाराचें असेल त्या अमलदाराला ती खालीं सांगितल्याप्रमाणें देण्याचा अधिकार आहे:

(अ) मरण पावलेल्या वर्गणीदाराचें किंवा ठेव देणाराचें मृत्युपत्र ज्या कोणत्याहि मृत्युपत्र चालविणारानें साबीत केलें असेल त्यास ती देण्याचा त्या अमलदाराला अधिकार आहे;

(ब) मृत्युपत्र झालेलें नाहीं अशी त्या अमलदाराची खात्री झाल्यास, किंवा वर्गणीदार अगर ठेव देणारा मरण पावल्यानंतर तीन महिन्यांच्या आंत त्याजकडेस मृत्युपत्र हजर करण्यांत न आल्यास, फंडाच्या नियमांप्रमाणें ती मिळण्याचा ज्या कोणत्याहि मनुष्यास हक्क असेल त्यास, अगर ज्या कोणत्याहि मनुष्याची मरण पावलेल्या वर्गणीदारानें किंवा ठेव देणारानें ती घेण्यासाठीं लेखी नेमणूक केली असेल त्या मनुष्यास ती न देण्याबद्दल फंडाचा कोणताहि नियम नसेल तर, त्या मनुष्यास ती देण्याचा त्या अमलदाराला अधिकार आहे;

(क) या कलमांत वर ठराव केलेला नाहीं अशा कोणत्याहि बाबतींत, ज्या कोणत्याहि मनुष्यास ती घेण्याचा हक्क आहे असें त्या अमलदारास वाटेल त्या मनुष्यास ती देण्याचा त्या अमलदाराला अधिकार आहे.

(२) पोट-कलम (१) यांतील ठराव, जी कोणतीहि रकम, या आक्टाच्या सुरवातीच्या वेळीं, आधींच मरण पावलेल्या कोणत्याहि वर्गणीदाराच्या किंवा ठेव देणाराच्या खातीं जमा असेल त्या रकमेस लागू करण्याचा अधिकार आहे.

**सरकारी व रेलवे प्राव्हिडेंट फंड जप्त करतां कामा नयेत.**

४. या आक्टाच्या सुरवातीनंतर, कोणत्याहि सरकारी किंवा रेलवे प्राव्हिडेंट फंडांतील अवश्य ठेवी, अशा फंडाच्या वर्गणीदाराविरुद्ध किंवा त्या फंडांत ठेव देणाराविरुद्ध न्यायाच्या कोर्टानें केलेल्या कोणत्याहि हुकुमनाम्याअन्वयें किंवा हुकुमाअन्वयें जप्त केल्या जाण्यास पात्र होणार नाहींत असें समजावें.

**या आक्टाअन्वयें इमानानें केलेल्या कोणत्याहि कृत्याबद्दल संरक्षण.**

५. जें कोणतेंहि कृत्य या आक्टाच्या ठरावांस अनुसरून इमानानें करण्यांत आलें असेल किंवा करण्याचा इरादा असेल त्या कृत्याच्या संबंधानें कोणत्याहि मनुष्याविरुद्ध कोणताहि दावा किंवा इतर कायदेशीर काम चालणार नाहीं असें समजावें.

**इतर प्राव्हिडेंट फंडांना हा आक्ट लागू करण्याचा अधिकार.**

६. गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे आपल्या नजरेस येईल त्याप्रमाणें, सरकारी ग्याझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून, या आक्टाचे ठराव, सन १८७९ चा स्थानिक अधिकाऱ्यांनीं पैका कर्जीं काढण्याबाबद आक्ट याच्या अर्थाप्रमाणेंच्या कोणत्याहि स्थानिक अधिकाऱ्यानें आपल्या नोकरलोकांच्या हितासाठीं स्थापन केलेल्या कोणत्याहि इतर प्राव्हिडेंट फंडास लागू करण्यास मुखत्यार आहेत.

**लष्करी शिपायाच्या एस्टेटीच्या संबंधानें अपवाद.**

७. जो कोणताहि युरोपियन अमलदार, बिनसनदी अमलदार किंवा लष्करी शिपाई हिंदुस्थानांत मालिका माआझमांच्या नोकरींत असतांना मरण पावेल त्याच्या, किंवा जो कोणताहि युरोपियन आपल्या मरणाच्या वेळीं अशा नोकरीवरून फरारी असेल त्याच्या, एस्टेटीच्या पैक्यास ३ ऱ्या कलमांतील कोणताहि ठराव लागू होणार नाहीं असें समजावें.

## हेतु व कारणें यांचें निरूपण.

एकाद्या प्राव्हिडेंट इन्स्टिटयूशनच्या मेंबराच्या मरणाच्या वेळीं त्याच्या नांवें जमा असलेला ऐवज कितीहि थोडा असला तथापि तो, प्रोबेट किंवा वहिवाट चालविण्याची सनद किंवा वारसा सर्टिफिकेट हजर केल्यावांचून, अदा करण्याबाबद हल्लींच्या कायद्यांत कांहीं ठराव नाहीं. बऱ्याच बाबतींत असा ऐवज थोडा असतो, आणि कांहीं अंशीं लोकांच्या अज्ञानामुळें व कांहीं अंशीं सदर्हू प्रकारचा अखत्यार मिळविण्याच्या कामीं होणाऱ्या श्रमामुळें व खर्चामुळें तो बहुतेक प्रसंगीं बिनवारशी पडून राहण्याचा संभव असतो, आणि तेणेंकरून, ज्या गरीब प्रतीच्या वर्गणीदारांच्या वारच्यांच्या हितासाठीं हीं प्राव्हिडेंट इन्स्टिटयूशनें चालविलेलीं असतात त्या वारच्यांचे फार हाल होतात. ही अडचण, सरकारी सेव्हिंग्स ब्यांकांच्या संबंधानें दूर केली आहे त्याप्रमाणें कांहीं अमुक रकमेपर्यंतच्या ऐवजांच्या बाबतींत दूर करण्यासाठीं हा मसुदा योजिला आहे.

२. तसेंच, हिंदुस्थान सरकारास अशी सल्ला देण्यांत आली आहे कीं ज्यापेक्षां प्राव्हिडेंट इन्स्टिटयूशनच्या मेंबराच्या नांवें जमा असलेला पैका, पुढील प्रसंगांपैकीं कोणताहि प्रसंग घडून आल्यावर, ह्मणजे, तो मेंबर नोकरी सोडून घरीं बसल्यावर, तो मरण पावल्यावर, त्यास नोकरीवरून दूर केल्यावर किंवा त्याजकडून कसूर झाल्यावर, प्रसंगानुसार त्याला किंवा त्याच्या एस्टेटीला त्या इन्स्टिटयूशननें द्यावयाच्या कर्जादाखल होतो त्यापेक्षां तो पैका कर्जादाखल होई तोंपर्यंत, ह्मणजे, वरील प्रसंगांपैकीं कोणता तरी एक प्रसंग घडून येई तोंपर्यंत, सिव्हिल प्रोसीजर कोडाच्या २६६व्या कलमाअन्वयें कोर्ट जप्त करूं शकत नाहीं. सबब, एकादा मेंबर मरण पावल्यास त्याच्या नांवें जमा असलेली रकम जप्त होण्याचा संभव असतो व त्यामुळें सदर्हू इन्स्टिटयूशनचा हेतु निष्फळ होऊन ज्यांच्या फायद्यासाठीं त्या मेंबरानें वर्गणी भरलेली असते त्यांचें बिलकूल हित न होण्याचा संभव असतो. यास्तव अशा प्रकारच्या पैक्याच्या रकमांचें जप्तीपासून रक्षण करण्याचा इरादा आहे.

३. हा मसुदा प्रथमतः सरकारी व रेलवे प्राव्हिडेंट फंडांनाच मात्र लागू केला आहे, परंतु त्यांतील ठराव स्थानिक अधिकाऱ्यांनीं पैका कर्जीं काढण्याबाबद आक्ट (सन १८७९ चा ११ वा) याच्या अर्थाप्रमाणेंच्या कोणत्याहि स्थानिक अधिकाऱ्यानें आपल्या नोकरलोकांच्या हितासाठीं स्थापन केलेल्या कोणत्याहि इतर प्राव्हिडेंट फंडास लागू करण्याबाबद ६ व्या रकमेंत ठराव केला आहे.

तारीख २६ माहे सप्टेंबर, सन १८९६. (सही.) एम्. डी. चामर्स.

(True translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.